● सोमवार, दि ३० सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## महाविकास आघाडीने हिंदुत्वावर आघात करत जाती-जातीत भांडण लावली- आ. लोणीकर

### संत जनार्दन महाराज संस्थान नळडोह येथे सभागृह व पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र सर्व मराठवाडा ही संत महंतांची भूमी असून आपल्याकडे संतांची खूप मोठी परंपरा आहे संतांचा विचारधारेतूनच आपली संस्कृती आजपर्यंत टिकून आहे. मतासाठी विरोधक लांगुलचालन करत गावात तेढ निर्माण करू शकतात अशीच परिस्थिती आज गावोगावी दिसत आहे ही परिस्थिती समजून घेत सुज्ञ नागरिकांनी सजग आणि जागृत राहण्याची गरज आहे, महाविकास आघाडीने हिंदुत्त्वावर आघात केला आहे. ते जाती-जाती भांडण लावण्याचे काम करत असल्याची टिका माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी येथे केली.

नळडोह पेवा येथे माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह संत महंतांच्या उपस्थितीत टाळ मृदंगाच्या गजरात संत जनार्दन महाराज संस्थान नळडोह येथे १ कोटी रुपयांच्या सभागृहाचे आणि ४० लक्ष रुपयांच्या पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी श्री लोणीकर बोलत होते यावेळी मंचावर हभप बबन महाराज हंडीकर हभप छगन महाराज टाकळीकर संस्थानचे सचिव आसेराव थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती

'सबका साथ - सबका विकास' या मूलमंत्राला डोळ्यासमोर ठेवून केंद्रात पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे काम करत असून महायुतीच्या सरकारने कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही परंतु महाविकास आघाडीने हिंदुत्वावर आघात करत जाती-जातीत भांडण लावली आहेत त्यामुळे गावपातळीवर अत्यंत गुण्यागोविंदाने राहणारे अठरापगड जातीचे लोक आज एकमेकांच्या समोर आले आहेत अशी टीका आमदार बबनराव लोणीकर यांनी केली



आपण आयुष्यात कधी खोटं नारळ फोडलेले नसून दिलेला शब्द काय पाळण्याचा प्रयत्न केलेला आहे श्रावण मासाच्या निमित्ताने संत जनार्दन महाराजांच्या दरबारात दिलेल्या शब्द खोटा ठरवू नये याची मनोमन मला खूप चिंता होती त्यामुळे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस व ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून या भव्यसभा मंडपासाठी १ कोटी रुपयांचा निधी खेचून आणला आहे मी या संतभूमीमध्ये दिलेला शब्द पाळण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली आता लवकरच भव्य सभा मंडपाची उभारणी केली जाणार आहे याचा मला मनस्वी आनंद आहे असेही यावेळी आमदार लोणीकर म्हणाले.

संस्कृती टिकवण्यासाठी हजारो वर्षांपासून साधुसंतांनी देवदेवतांच्या मंदिरांची उभारणी केली आहे त्यामुळेच परतुर मतदार संघात कुठेही मंदिर बांधलं गेलं तर त्या ठिकाणी सभामंडप बांधण्याची जबाबदारी माझी असल्याचे मी समजतो असेही श्री लोणीकर यावेळी म्हणाले.

मतासाठी विरोधक लांगुलचालन करत गावात तेढ निर्माण करू शकतात अशीच परिस्थिती आज गावोगावी दिसत आहे ही परिस्थिती समजून घेत सुज्ञ नागरिकांनी सजग आणि जागृत राहण्याची गरज आहे आपण सर्वजण सर्वप्रथम भारतीय आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये रुजणे अत्यंत आवश्यक असून जातीपातीचे विष आपल्यामध्ये भिन्नता कामा नये त्यामुळे कुणाची ही भले होणार नाही उलट सुखदुःखात सर्व जाती-धर्माचे लोक एकमेकांसाठी धावून येतात हीच आपली खरी संस्कृती आहे त्यामुळे गाव पातळीवर मतासाठी लांगूलचालन करणाऱ्या लोकांपासून सावध राहण्याची गरज असून विकासाभिमुख व्यक्तीच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची गरज आहे असेही यावेळी आमदार लोणीकर म्हणाले. यावेळी श्री गणेशराव खवणे श्याम सोनय्या स्वामी पान २ वर

## परतूरात काँग्रेसच्या परिवर्तन पदयात्रेला नागरिकांचा प्रतिसाद



**परतूर । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाकडून अनेक दिवसापासून बालासाहेब आकात हे परिवर्तन पदयात्रेच्या माध्यमातून मतदार संघातील प्रत्येक गाव वाडी वस्ती तांडा येथील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. बालासाहेब आकात यांच्या नेतृत्वात परतूर तसेच मंठा येथे काढण्यात आलेल्या भव्य परिवर्तन पद यात्रेला विधान परिषद आमदार राजेश राठोड, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनवर देशमुख, सोनाजी बोराडे, शरदराव बोराडे, प्रकाश घुले तसेच काँग्रेसचे पदाधिकारी ,कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदार संघातील जनतेचे विविध प्रश्न जाणून घेण्यासाठी ही पदयात्रा सुरू आहे. सत्ताधारी पान २ वर

## बाजारबुणगे; महाराष्ट्राला गुलाम करण्याची भाषा करतात -उद्धव ठाकरे



**नागपूर -** अमित शाह यांनी चार दिवसांपूर्वी नागपूरमध्ये येऊन बंददाराआड मला आणि शरद पवार यांना संपवण्याची भाषा केली. त्यांनी आता बंद दाराआडचे धंदे बंद करावे. हिंमत असेल तर अमित शाह यांनी मैदानात येऊन आम्हाला संपवण्याची भाषा करून दाखवावी, असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आज नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरुढ पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. यावेळी बोलतान त्यांनी भाजपावर तसेच शिंदे सरकारवर जोरदार टीका केली. अमित शाह हे आठ दहा दिवसांपूर्वी नागपूरमध्ये येऊन पान २ वर

### युवा आदर्श

### वादळ ...

राजकारणी उठले
कसले चक्री वादळ
पाहता पाहता पहा
गुरफटू गेले सकळ
डोळ्यांत गेली धूळ
कशी उठे वावटळ
भले बुरे ते दिसेना
विवाद आहे अटळ
भेटीगाठी गाठीभेटी
वाढू लागली वर्दळ
जुनी नाती तुटे फुटे
हरवे सुगंधी दर्वळ
मांडीला मांडी लावी
बसेना आता जवळ
भूक हरवली पोटात
असून सोनेरी कवळ
विसरून गेली कशी
जनसेवेची तळमळ
फक्त दिसतेयं खुर्ची
नात्या येता मरगळ
चालती सारे वाकडे
रस्ते असूनि सरळ
सत्ता देवी आकर्षक
घालते सर्वां भुरळ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## काँग्रेसरूपी घाण साफ करण्यासाठी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागा - आशाताई मामेडी

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस रुपी घाण साठलेली असून आगामी येणाऱ्या विधानसभेमध्ये ही घाण आपल्याला मुळासह साफ करायची आहे.

ज्याप्रमाणे आपण आपल्या घरा-दारातील घाण साफ करत असतो, त्याचप्रमाणे ही घाण साफ करण्यासाठी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी, शिवसेना युवासेना व इतर सलग संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आता कामाला लागावे असे शिवसेना महिला आघाडीच्या नेत्या व शिवसेना उपनेत्या आशाताई मामेडी यांनी उपस्थित महिलांना व शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना सांगितले

शहरातील भाग्यनगर संपर्क कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीस शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री मा. श्री. अर्जुनराव खोतकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, परभणी जिल्हा संपर्कप्रमुख सुभाषराव सोळंके, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ.कलिंदाताई ढगे, शहर प्रमुख जफर खान, सविता किवंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आशाताई यांची जालना विधानसभा मतदारसंघाच्या महिला आघाडीच्या समन्वयक पदी शिवसेना पक्षाने नियुक्ती केली. आशाताई मामेडी यांच्या उपस्थितीमध्ये पहिलीच बैठक शिवसेना कार्यालय भाग्यनगर, जालना येथे आयोजित करण्यात आली होती.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, परभणी जिल्हा संपर्कप्रमुख सुभाषराव सोळंके व माजी राज्यमंत्री तथा शिवसेना उपनेते अर्जुनभाऊ खोतकर यांनी देखील मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी घेतलेले निर्णय सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम महिला आघाडीने आता हाती घेणे महत्त्वाचे आहे व यासाठी त्यांनी समर्पित होऊन कामाला लागावे.



बैठकीस कालींदाताई ढगे, रत्नमाला जाधव, उज्वला फोपालिया, ज्योती म्हस्के, वंदना वाहुळकर, अरुणा कौचट, ममता खरात, सुनिता जाधव, सारिका कंकाळ, रुक्मिणी हांडे, संगीता फोपालिया, दुर्गा देशमुख, लक्ष्मी भुतडा, सीमा गवारे, सविता भोसले, वंदना चौधरी, कल्पना झीने, तसेच शिवसेना, युवासेना, महिला आघाडी पदाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरकारच्या धोरणातून लघु वृत्तपत्रे वंचित का ?

### प्रदीप कुलकर्णी यांचा सरकारला सवाल

**माजलगाव । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याच्या वतीने आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून दूरदर्शनच्या विविध वाहिन्या द्वारे जाहिरात बाजी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे . मात्र जी वृत्तपत्रे या सरकारच्या चांगल्या बातम्या, त्यांच्या योजना विस्तार पूर्वक जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करतात अशा वृत्तपत्रां कडे मात्र सरकारचा काना डोळा होत असून जाहिरात वितरणात त्यांच्यावर अन्याय केला जात आहे अशी भावना छोट्या वृत्तपत्रांच्या सर्व संपादकां मध्ये झाली आहे .

राज्यातील छोट्या वृत्तपत्रांवर राज्य सरकारने अन्याय न करता त्यांना देखील विशेष प्रसिद्धी मोहिमेच्या जाहिराती दिल्या पाहिजेत , अशी आग्रही मागणी असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडियाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी एका निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथराव शिंदे यांच्याकडे केली आहे.

राज्यात लवकरच आचारसंहिता लागण्याची चिन्हे असून दिवाळीच्या नंतर विधानसभा निवडणुका होण्याची दाट शक्यता आहे अशा पार्श्वभूमीवर राज्यात शासनाने ज्या विविध योजना राबविल्या किंवा ज्या नव्याने सुरू केल्या त्या संदर्भातील जाहिराती विशेष प्रसिद्धी मोहिमेच्या अंतर्गत राज्यातील छोट्या वृत्तपत्रांना प्राधान्याने दिल्या पाहिजेत यापूर्वी जे जे सरकार अस्तित्वात होते त्या त्या सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी , लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी राज्यातील सर्व शासनमान्य जाहिरात यादीवरील वृत्तपत्रांना अशा प्रकारच्या जाहिराती दिल्या आहेत. आणि या जाहिराती दिल्यानंतर शासनाच्या विविध योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचल्या जाऊ शकतात आणि याचा आवश्यक तो परिणाम निवडणुकीत सुद्धा सत्ताधारी पक्षाला झालेला दिसून आलेला आहे. तेव्हा लोकसभा निवडणुकीत राज्यातील छोट्या वृत्तपत्रांना वगळून परिस्थिती काय निर्माण झाली ? याचा अभ्यास करताना एकाच अंगाने तो न पाहता राज्यातील छोट्या वृत्तपत्रांना जाहिराती न दिल्याचा काही अंशी का होईना परिणाम नक्की झालेला आहे . तेव्हा आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने विशेष प्रसिद्धी मोहीम पान २ वर

## चंदनझिऱ्यात गुणवंतांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** चंदनझिरा येथील मातोश्री पुरुष बचत गटाच्या वतीने चदंनझिरा येथील वैद्यकीय व अभियांत्रिकीत प्रवेश प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा रविवार (दि.२९) उत्साहात पार पडला.

या वेळी मातोश्री बचत गटाचे अध्यक्ष उद्योजक आत्माराम चव्हाण डॉ.भागवत काळे .डॉ.गजानन मगर माजी नगरसेवक सतीश जाधव.जगन्नाथ चव्हाण.शांतीलाल राऊत. सोमनाथ गायकवाड . गणेश कोल्हे. मधुकर बरसाले .रितेश पंचारिया . श्याम खरात पुजाराम शेळके. अशोक पारे .दिनेश आवटे. गणेश सहाने. वसंत भट्ट. रामकिशन शेवाळे. गणेश तुपे. गणेश डिघोळे. राजाभाऊ जाधव. यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बचत गटाचे सचिव मधुकर बरसाले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून बचत गटाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहीती दिली या प्रसंगी एम बी बी एस साठी पात्र विद्यार्थ्यी पार्थ सतीश जाधव. ध्वीज गणेश कोल्हे तर बी ए एम एस. साठी पान २ वर

# संपादकीय

## बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आधुनिक पीक पद्धतीचा अंगीकार करून बळीराजाचे उत्पादन वाढविण्याचे कार्य कौतुकास्पद - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## सन २०२०, २०२१ व २०२२ वर्षातील राज्यस्तरीय कृषी सन्मान पुरस्कार वितरण सोहळा

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्र हे देशात प्रत्येक क्षेत्रात पुढाकार घेवून आपला ठसा उमटविणारे राज्य आहे. कृषी क्षेत्रातही राज्याची भरारी वाखणण्याजोगी आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जात असताना सगळीकडे शेतकरी आधुनिक पीक पद्धतीचा अवलंब करीत असल्याचे प्रकर्षाने दिसले. उत्पादन वाढीसाठी बळीराजा करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण यांनी काढले. यावेळी त्यांनी पुरस्कार विजेत्या शेतकरी बांधवांचे अभिनंदन केले.

कृषी विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षाचे सत्कार व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन वरळी येथील एन. एस. सी. आय डोम येथे करण्यात आले. त्यावेळी राज्यपाल श्री. राधाकृष्णन उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमास व्यासपीठावर उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे, कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे, फलोत्पादन विभागाचे संचालक कैलास मोते उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्ण म्हणाले, राज्याची एक रुपयात पीक विमा योजना ही देशात एकमेव आहे. या योजनेचा अन्य राज्य अंगीकार करत आहे. राज्यात कृषी क्षेत्रात अनुदान योग्य मार्गाने दिले जात आहे. शेततळ्याकरीता अनुदान देण्यात येत असल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर शेततळे घेवून शेतीला संरक्षित सिंचन उपलब्ध करत आहे. ठिबक सिंचन अनुदान ही राज्याची एक मोठी योजना आहे, यामुळे प्रत्येक थेंबाचा उपयोग उत्पादन वाढीसाठी होत आहे.

महाराष्ट्र राज्य कापूस, सोयाबीन, केळी व द्राक्ष उत्पादनात देशात अव्वल आहे. राज्यातील बळीराजाची मेहनत व आधुनिक तंत्रज्ञानाचा होत असलेला अंगीकार यामुळे महाराष्ट्र हे देशात कृषी क्षेत्रातील अग्रगण्य राज्य बनले आहे, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले. पुरस्कार वितरणावेळी शेतकरी माझ्यासोबत छायाचित्र काढत नाही, तर मीच शेतकऱ्यांसोबत छायाचित्र काढणार आहे, असे बोलून राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी बळीराजाच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाला राज्यभरातून आलेले शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संचालक (कृषी व विस्तार) विनयकुमार आवटे यांनी मानले.

**कापूस- सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २ हजार ५०० कोटी अर्थसाहाय्याचे वितरण - उपमुख्यमंत्री अजित पवार**

आपल्या काळ्या आईची सेवा करून मोठ्या कष्ट, मेहनतीने अन्नधान्याचे उत्पादन बळीराजा घेत असतो. कुठल्याही नैसर्गिक आपत्तीमध्ये शासन बळीराजाच्या पाठीशी आहे. २०२३ मध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना झालेल्या दरामध्ये झालेल्या नुकसानीपोटी प्रती हेक्टरी पाच हजार दोन हेक्टर मर्यादित देण्यात येणार आहे. राज्यातील आधार संलग्न बँक खात्यांची पडताळणी झालेल्या ६५ लाख शेतकऱ्यांना अनुदान मंजूर झाले आहे. या अर्थसहाय्याचे वितरण डीबीटी प्रणालीद्वारे थेट बँक खात्यात उद्यापासून करण्यात येणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली. तसेच ऊर्वरित शेतकऱ्यांच्या खात्याचे आधार संलग्नता व कागदपत्रांची पडताळणी करून अर्थसाहाय्याचे वितरण करण्यात येईल,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री पवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या साडेसात अश्वशक्तीपर्यंत कृषी वीजपंपाचे देयक माफ करण्यात आले आहे. यापुढे साडेसात एचपीपर्यंत वीज पंप असणाऱ्या शेतकऱ्यांना देयक येणार नाही. दिवसा वीज देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. त्यानुसार ९ हजार ५०० मेगावॅट वीज सौर उर्जेवर निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. पुढील सहा महिन्यात शेतकऱ्यांना दिवसा पूर्णपणे वीज मिळणार आहे. शेतकऱ्यांना २४ हजार कोटी रुपये खर्चून साडेआठ लाख सौर कृषी पंपाचे वितरण हे करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी जिथे केंद्र शासनाची मदतीची आवश्यकता असते, तिथे केंद्रशासन राज्याला मदत करीत आहे. कांदा व बिगर बासमती तांदुळावरील निर्यात बंदी उठविण्यात आली आहे. सोयाबीन खाद्यतेलावर आयात शुल्क वाढविल्यामुळे सोयाबीनच्या किमती वाढणार आहे. याचा लाभ सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे. ऊसाला किमान आधारभूत किंमत वाढवीण्यासाठी केंद्र शासनाची चर्चा झाली आहे. शासन गायीच्या दुधाला सात रुपये प्रति लिटर अनुदान, अटल बांबू समृद्धी योजना, नळगंगा - वैरागंगा नदी जोड प्रकल्प, पश्चिमेकडून समुद्रात वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळविणे अशा महत्त्वाच्या योजनांवर शासन काम करीत आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले. बळीराजाला त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम चौपट करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

**शेती क्षेत्रात संशोधन करून शेतकऱ्यांनी समाजात सुबत्ता आणली - कृषिमंत्री धनंजय मुंडे**

हजारो वर्षांपूर्वी शेतीची जेव्हा सुरुवात झाली, तेव्हापासून शेतकरी या व्यवसायात आहे. शेती क्षेत्रात संशोधन करून शेतकऱ्यांनी समाजात सुबत्ता आणली आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज सत्कार व पुरस्कार वितरण समारंभात केले.




कृषिमंत्री श्री. मुंडे म्हणाले, कृषी विभागाने मिशन मोडवर पुरस्कारांची छाननी पूर्ण करून मागील तीन वर्षांचे पुरस्कार देण्यात येत आहे. बळीराजाला मुंबईत सन्मानपूर्वक आमंत्रित करून त्याच्या कार्याचा यथोचित गौरवाने काळ्या आईची सेवा करणाऱ्या बळीराजाचे ऋण फेडण्याची ही संधी आहे.

परंपरागत शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात येत आहे. शेतीमध्ये ड्रोनचा वापर करण्यात येत आहे. शेतीमालाच्या दरासाठी ॲग्रोथॉन प विकसित करण्यात आले आहे. सोयाबीन संशोधनासाठी शासन प्रयत्न करीत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, सोयाबीन उत्पादन वाढ व मूल्य साखळीचा विकास, एक रुपयात पिक विमा, कृषी यांत्रिकीकरण, गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात अनुग्रह अनुदान योजना, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आदींची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

परळी (जि. बीड) येथे सोयाबीन संशोधन संस्था, नागपूर येथे आंतरराष्ट्रीय कृषी संशोधन केंद्र, चांदूरबाजार (जि. अमरावती) येथे सिट्रेस इस्टेट, दिवे आगार येथे सुपारी संशोधन केंद्र, बुलढाण्यात शासकीय कृषी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०२३ - २४ मध्ये राज्यात १४२. ६४ लाख मेट्रिक टन अन्नधान्य उत्पादन घेण्यात आले आहे. यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ३. ३९ टक्क्याने वाढ नोंदविण्यात आली आहे. हे सर्व माझ्या बळीराजाचे यश आहे, अशा शब्दात कृषी मंत्री श्री मुंडे यांनी बळीराजाचे कौतुक केले.

राज्याच्या कृषी क्षेत्राच्या भरीव कामगिरीची दखल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील घेण्यात आली आहे. वर्ल्ड अग्रिकल्चर फोरमने राज्यला दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देऊन सन्मानित केले आहे, असेही कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी सांगितले.

**विविध कृषी पुरस्कारांचे वितरण**

सन २०२०, २०२१ व २०२२ करिता विविध कृषी पुरस्कारांचे वितरण राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याहस्ते आज विविध ४४८ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यामध्ये ५ शेतकरी बांधवांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, २७ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, २६ शेतकऱ्यांना जिजामाता कृषी भूषण पुरस्कार, २५ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार, २१ शेतकऱ्यांना कृषी भूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, २५ शेतकऱ्यांना युवा शेतकरी पुरस्कार, २५ शेतकऱ्यांना उद्यान पंडित पुरस्कार, ९६ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्वसाधारण गट), १७ शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी गट) शेतकऱ्यांना देण्यात आले. तर २७ अधिकारी व कर्मचारी यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार देण्यात आले. तसेच राज्यस्तरीय पीक स्पर्धेतील विजेत्या १५४ शेतकऱ्यांना यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आले. अशा प्रकारे ४४८ शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यात आले.

# खानापूर शाळा समिती अध्यक्षपदी शेळके, उपाध्यक्षपदी तायडे

टेंभुर्णी । प्रतिनिधी - येथून जवळच असलेल्या खानापुर ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विश्वास शेळके तर उपाध्यक्षपदी नंदकिशोर तायडे यांची गुरुवारी ता.२६ बिनविरोध निवड करण्यात आली.मावळते अध्यक्ष सुभाष तायडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित पालक सभेत सदर निवड करण्यात आली.उर्वरित समितीत सदस्य म्हणून ऋषिंद्र जगन शेळके, मंदा विकास बरडे,रामदास घोरपडे,कौतिक शेषराव तायडे, अर्चना एकनाथ काकडे, अरुणा सुनिल शेळके,लता बळीराम शेळके,रामदास गणेश शेळके(शिक्षण तज्ञ)दिपाली ऋषिंद्र शेळके(ग्रामसंसद प्रतिनिधी)सचिव म्हणून मुख्याध्यापक विनोद कळंबे,शिक्षक प्रतिनिधी दिनेश डोईफोडे यांचा समावेश आहे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला मावळत्या समितीचे अध्यक्ष सुभाष तायडे यांचा ही शाळा व पालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.



पान १ वरुन

## महाविकास आघाडीने ...

विलास घोडके जगदीश जाधव अमोल मोरे विठ्ठलराव काळे प्रसादराव गडदे गजानन देशमुख गोविंदराव देशमुख शरद पाटील अशोक आप्पा सोनटक्के कानोबा थोरात शेषनारायण दवणे राजेभाऊ खराबे नितीन सरकटे किशोर हनवते भागवत पोटे प्रकाश गबाळे नवनाथ चट्टे शिवशंकर डोईफोडे पांडुरंग काळे रामेश्वर देशमुख गुलाबराव राठोड प्रकाशराव गडदे प्रसादराव खरात आबासाहेब सरकटे सुनील कांगणे श्रीरंग देशमुख पंजाबराव पुणेकर पवन केंदळे मनोज देशमुख जानकीराम चव्हाण सचिन राठोड बाबाजी जाधव आनंद जाधव पंकज राठोड मधुकर आप्पा सोनटक्के संतोष लाकोळे उद्धवराव सोनकर ओंकारराव वरणकर भीमाअप्पा कौटकर रामभाऊ राठोड गोबरा राठोड ज्ञानेश्वर थोरात सुरेश काळे माणिक पवार भुजंग राठोड शंकर फड सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता श्री सोनी यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते भक्त परिवार व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परतूरात कॉँग्रेसच्या ...

पक्षाच्या लोकप्रतिनिधी विरोधात मतदारसंघातील जनतेच्या मनात प्रचंड नाराजी आहे. आगामी निवडणुकीत परिवर्तन घडविण्याचा निर्धार जनतेने केला आहे, परिवर्तन निश्चित घडणार अशी प्रतिक्रिया बालासाहेब आकात यांनी दिली आहे. ग्रामीण भागात या पदयात्रेला चांगला प्रतिसादही मिळत आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यातील वातावरण तापलेले असताना कॉँग्रेसकडून उमेदवारीचा दावा करणाऱ्यामध्ये बालासाहेब आकात हे मराठा उमेदवार म्हणून प्रबळ दावेदार मानले जात आहे.

## बाजारबुणगे ...

गेले. त्याच्या काही दिवसांपूर्वी पुण्यात येऊन गेले. त्यावेळी त्यांनी मला औरंगजेब फॅन्स क्लबचा सदस्य म्हटलं. पण मला जर ते औरंगजेब फॅन्स क्लबचा सदस्य म्हणतील तर ते अहमदशाह अब्दाली आहेत. चार दिवसांपूर्वी नागपूरमध्ये येऊन त्यांनी बंददाराआड मला आणि शरद पवार यांना संपवण्याची भाषा केली. त्यांनी आता बंद दाराआडचे धंदे बंद करावे. त्यांच्यात हिंमत असेल त्यांनी मैदानात येऊन आम्हाला संपवण्याची भाषा करून दाखवावी, हे बाजारबुणगे बाहेरून येतात आणि महाराष्ट्राला गुलाम करण्याची भाषा करतात, असं उद्धव ठाकरे म्हणाले. भाजपाला अख्खा महाराष्ट्र गिळायचा आहे. त्यामुळे त्यांना शिवसेना नको आहे. त्यामुळेच त्यांना शरद पवार नको आहे. पण हा महाराष्ट्र हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे. जर हा महाराष्ट्र तुम्ही गिळण्याचा प्रयत्न केला, तर ही जनता तुमचा कोथळा बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला. तसेच पुढे बोलताना, लोकसभा जिंकली, आता विधानसभा जिंकायची आहे. लोकं मेली तरी चालेल, पण भाजपाला सत्ता हवी आहे. दसरा मेळाव्यानंतर मी महाराष्ट्रात फिरणार आहे, असेही त्यांनी सांगितलं.

लोकसभा निवडणुकीत रश्मीताईंचा अर्ज बाद झाला. तेव्हा सुनील केदार म्हणाले चिंता करु नका. तेव्हा प्रमाणपत्र अवैध ठरवण्याचा निर्णय अवैध होता असं कोर्टाने म्हटलं. आता गुन्हेगार कोण? स्त्यावरून प्रमाणपत्र घेतो का? ज्यांनी रश्मी बर्वेचं प्रमाणपत्र अवैध ठरवलं त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन तुरुंगात टाकावं, अशी मागणीही उद्धव ठाकरेंनी यावेळी केली.

## चंदनझिऱ्यात गुणवंतांचा ...

पात्र विद्यार्थ्यी भाग्यश्री वसंत भट्ट. रुपाली सोमनाथ गायकवाड. गौरव गणेश तुपे .करण कृष्णा फुलझाडे . भीष्मप्रताप राजाभाऊ जाधव. तसेच इतर क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यी मयुरी आत्माराम चव्हाण. रोहिणी शाम खरात. रौनक सुनील पारे. श्रद्धा राम किशन शेवाळे.सार्थक बाबासाहेब शेळके. आदी विद्यार्थ्यांचा पुष्पहार भेट वस्तु देऊन सत्कार करण्यात आला या वेळी डॉ. भागवत काळे आत्माराम चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक पारे यांनी केले तर आभार प्रदर्शन वसंत भट्ट यांनी केले. याप्रसंगी परिसरातील विद्यार्थ्यी नागरिक यांची उपस्थिती होती.

## वारकरी व हिंदु धर्म...

आहे. हिंदु आणि वारकरी वेगळे असल्याचा अप्रचार विद्रोही मंडळी करत आहे. मुळात हे दोन्ही एकच आहेत. ख्रिस्ती लोक हिंदूंची नावे देऊन हिंदूंचे धर्मांतर केले जात आहे. परधर्मात गेलेल्या हिंदूंना आपल्या धर्मात आणणे हे वारकर्यांचे कर्तव्य आहे. या विरोधात वारकर्यांनी सतर्क राहून धर्मांतराला विरोध केला पाहिजे. हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांच्या विरोधात वारकर्यांनी लढा देणे आवश्यक आहे. हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्यांचे संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की, अर्बन नक्षलवाद्यांची भयानक समस्या देशात आहे. काश्मीरमध्ये ३२ वर्षांपूर्वी हिंदूंच्या हत्या झाल्या; मात्र पुरोगामी, साम्यवादी मंडळींनी तोंड उघडले नाही. या संघटना अर्बन नक्षलवाद्यांना साहाय्य करत आहेत. देशात बिग्रेडी लोक, पुरोगामी, साम्यवादी यांनी हिंदु धर्म आणि हिंदु समाजाच्या विरोधात समाजात ‘नरेटिव्ह’ (खोटे कथानक) निर्माण करून सनातन धर्म नष्ट करण्याचे षड्यंत्र रचले आहे. हा शहरी नक्षलवाद आता वारकर्यांच्या वारीतही घुसला आहे. या नक्षलवाद्यांकडून हिंदु धर्म वेगळा, वारकरी संप्रदाय वेगळा असा भेदभाव करून हिंदूंच्या मनात विष पेरले जात आहे. त्यामुळे वारकरी संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी संघटित होऊन हे षड्यंत्र हाणून पाडले पाहिजे. हिंदूंच्या सर्व समस्या सोडवायच्या असतील, तर एकच पर्याय हिंदु राष्ट्राची स्थापना करणे होय ! रणरागिणी शाखेच्या कु. क्रांतीताई पेटकर म्हणाल्या की, हलाल अर्थव्यवस्थेत हिंदूंचा पैसा आतंकवाद्यांना साहाय्य करण्यासाठी वापरला जात आहे. त्यामुळे देशाला घातक असलेल्या हलाल अर्थव्यवस्थेच्या विरोधातील जनआंदोलनात वारकर्यांनी सहभागी झाले पाहिजे.

## सरकारच्या धोरणातून ...

राबवताना राज्यातील छोट्या वृत्तपत्रांचा प्राधान्याने विचार करावा , आता दिवस थोडे शिल्लक आहेत तेव्हा तातडीने जाहिराती सुरू कराव्यात आणि राज्यातील छोट्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून आपली प्रसिद्धी मोहीम अधिक तीव्र करावी असेही शेवटी राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

# परतूर येथील नाट्यगृहास छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्या

## प्रशासनाला देणार १० हजार सह्याचे निवेदन

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरात १५ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येत असलेल्या नाट्यगृहाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याची मागणी तालुक्यातील शिवप्रेमींकडून केली जात आहे. आपली




ही मागणी प्रशासनाकडे पोहचवण्यासाठी शिवप्रेमींच्या वतीने १० हजार सह्याचे निवेदन देण्यात येणार आहे. यासाठी विशेष स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. तालुक्याच्या गावागावातून शिवप्रेमी या स्वाक्षरी अभियानात सहभागी होणार आहेत. शुक्रवारी सकाळी तहसील कार्यालय परिसरात या स्वाक्षरी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते.

नाट्यगृहाचे काम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक त्या सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून प्रशासनाने नाट्यगृहाला छत्रपती शिवाजी महाराजाचे नाव देण्याची कार्यवाही करावी अशी मागणी स्वाक्षरी अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी शिवप्रेमींनी केली आहे.गजानन चवडे, नामदेव धुमाळ,प्रा. छबुराव भांडवलकर, विष्णू माकोडे,अजय मिठे, रामजी सोळंके,अंकुश शिंदे आदींची यावेळी उपस्थिती होती.

# वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे अकरावे पुष्प पेण तळे नालंदा बुद्ध विहारात संपन्न







**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव संकल्पित व विभाग शाखा क्रमांक अकरा आणि नालंदा बौद्धजन सेवा संघ, पंचशील महिला मंडळ, भीमगर्जना मित्रमंडळ पेण तर्फे तळे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी नालंदा बुद्ध विहार पेण तर्फे तळे येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेच्या अकराव्या पुष्प धम्म प्रबोधन मालिकेचे शानदार आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ११ चे विद्यमान अध्यक्ष मा. संतोष बाबाजी कासारे सर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रमाची सुरुवात श्रामणेर गोविंद तांबे यांच्या धम्म संस्कार विधी ने झाली. या नंतर प्रमुख मान्यवर आणि प्रमुख पाहुणे यांचा स्वागत सत्कार करण्यात आले.

या नंतर उपोसथ पालन या विषयावर प्रवचनकार अरविंद जी मोरे यांचे अभ्यासपूर्ण धम्म प्रबोधन झाले. आणि त्या नंतर भोजन दान कार्यक्रम झाला.

सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रमास शाखा क्रमांक अकरा चे विद्यमान पदाधिकारी, नालंदा बौद्धजन सेवा संघ, पंचशील महिला मंडळ च्या पदाधिकारी, बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे विद्यमान अध्यक्ष रविंद्र मोरे, सचिव आर डी साळवी, रणजित मोहिते, पत्रकार उत्तम तांबे, रायगड जिल्हा परिषद माजी समाज कल्याण सभापती अशोक गायकवाड, संजय गायकवाड, पत्रकार नरेश पाटील, एडव्होकेट राकेश मोरे, दिपक मोरे, पत्रकार विश्वास गायकवाड, जनार्दन गायकवाड, सखाराम गायकवाड, अविष्कार गायकवाड, रमेश घोगरे, विक्रम वाठोरे, जितेंद्र साळवी, बंडू मोरे, प्रकाश ओव्हाळ, भाऊ ओव्हाळ,गौतम मनवर, योगेश शिर्के, प्रवीण बागवे, महादेव पवार, बौद्धाचार्य गंगावणे, निलेश साळवी, प्रशांत मोरे, गंगाधर जाधव, इत्यादी मान्यवर, प्रमुख पाहुणे, बौद्धजन पंचायत समिती माणगाव तालुका शाखा अंतर्गत विभागीय विविध शाखेतील विभाग शाखा पदाधिकारी, धम्म उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिरखेडा येथील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी (शरद पवार) गटात जाहीर प्रवेश



**भोकरदन । प्रतिनिधी -** येथील माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या संपर्क कार्यालयामध्ये मौ. मेरखेडा ता.जाफ्राबाद येथील भारतीय जनता पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राजु जाधव यांच्या पुढाकारातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी प्रवेशकर्ते गणेश पडोळ, रवी लव्हाळे, विलास सोनवणे, समाधान शेरकर, सुरेश जाधव, जगन भुतेकर, नंदू मापारी, शेषराव जाधव, वसंता खरात, भागवत शेरकर, तुळशीराम केवट व राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रघुनाथ पंडित, माजी पंचायत समिती सदस्य रामदास रोडे, युवा नेते रामेश्वर जंजाळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सेवा दल तालुकाध्यक्ष राजू जाधव, कडूबा जाधव, अमोल शेळके, शेख असिफ, गजानन धुपे, ज्ञानेश्वर जाधव, रहमान शेठ पठाण, बळीराम शिंदे, ईश्वर कल्याणकर आदींची उपस्थिती होती.

# प्रदेश काँग्रेसचे सहप्रभारी चौधरी जिल्हाच्या दौऱ्यावर

**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव तथा राज्याचे सहप्रभारी कुणालजी चौधरी हे दिनांक २ आक्टोंबर २०२४ बुधवार रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून जिल्ह्यातील विधानसभेच्या पूर्व तयारीसाठी मार्गदर्शन करणार आहेत प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा जिल्हा प्रभारी नामदेवराव पवार यांच्या अध्यक्षते खाली पाठक मंगल कार्यालय मुक्तेश्वर द्वार जुना जालना येथे



बुधवार रोजी दुपारी ४:३० वा. बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी खासदार डॉ. कल्याणराव काळे, काँगेस पक्षाचे लोकसभेचे निरीक्षक डॉ.पि.सी.शर्मा, आमदार कैलास गोरंट्याल, आमदार राजेश राठोड, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, समन्वयक डॉ. जितेंद्र देहाडे, शेख फरीद, आर आर खडके, प्रदेश सरचिटणीस कल्याण दळे, एड. राम कुराडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, या बैठकीला जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, सर्व आघाडीचे जिल्हा अध्यक्ष, सेलचे जिल्हाध्यक्ष, माजी जि.प.प.स., न.प. सदस्य आणि जिल्ह्यातील सर्व बी.एल.ए. व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जालना जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शेख मेहमूद यांनी केले आहे.

# नायब तहसिलदार प्रकाश जाधव यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** प्रकाश जाधव यांना जालना तहसिल नायब तहसीलदार पुरवठा म्हणून पदउन्नती नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे बहुजन समाज पार्टी जालनाच्या वतीने हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. तसेच महसुल सहाय्यक म्हणून विशाल लताड़, पुरवठा निरीक्षक म्हणून शाम सपाटे यांचीही नवीन नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी बहुजन समाज पार्टीचे जालना विधानसभा अध्यक्ष राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी प्रकाश जाधव यांच्या कामकाजाबाबत बोलताना म्हणाले ते कार्यक्षम असून त्यांची काम करण्याची पध्दत चांगली आहे. ते सर्वांना विश्वासात घेऊन काम करतात. शासनाच्या सर्व योजनांचा लाभ तळागाळातील लोकांच्या पर्यंत पोहचविण्यासाठी काम करतात असे शेवटी सांगितले. यावेळी बहुजन समाज पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष चंद्रमणी गाडेकर, जालना जिल्हाप्रभारी फेरोज अली, ॲड. जयकुमार भालमोडे, शहराध्यक्ष सिद्धार्थ मोरे, जालना विधानसभा प्रभारी संजय खरात, शेख फेरोज, विधानसभा उपाध्यक्ष कुलदीप चांदोडे, विधानसभा महासचिव रविंद्र गवई, विधासभा सचिव दिपक डोंगरे, विधानसभा सचिव राहुल खिल्लारे, विधानसभा कोषाध्यक्ष सैय्यद स्माईल आदींची उपस्थिती होती.

# परतूरचे पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे यांना बंधू शोक



**परतूर । प्रतिनिधी -** येथील पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे यांचे जेष्ठ बंधू गोरख तुकाराम सुरवसे यांचे दि २६ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. बीड जिल्ह्यातील चाकरवाडी त्यांच्या गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते ६२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ, दोन मुले, एक मुलगी,भावजई, सुना,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# वाघ्रुळ येथे भास्कर दानवे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** मौजे वाघ्रुळ ता.जि.जालना येथे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे उदघाटन व लोकार्पण सोहळा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या हस्ते पार पडला.

वाघ्रुळ गावासाठी खासदार निधी रंगनाथ महाराज मंदिरास सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रुपयांचा निधी, सी. सी. रोड च्या बांधकामासाठी ७ लक्ष रुपये, त्याचप्रमाणे ९५१५ योजनेअंतर्गत रंगनाथ महाराज मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी १० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. तसेच गावकऱ्यांच्या मागणीनुसार श्रीधर खरात यांच्या घरापासून शरद खरात यांच्या एजंसीपर्यंत सिमेंट रोड चे बांधकाम करण्यासाठी खासदार निधी अंतर्गत ५ लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला होता, यावेळी या सर्व झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

तसेच गावामध्ये तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत सी.सी. रोड व भूमिगत नालीचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रुपये, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सी. सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष रुपये, दलितवस्ती अंतर्गत आंबेडकर नगर येथे भूमिगत नालीचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रुपये व दलितवस्ती अंतर्गत महात्मा फुले नगर येथे भूमिगत नालीचे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे यावेळी या सर्व कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना, पंतप्रधान मोदी यांच्या सबका साथ, सबका विश्वास, सबका विकास या संकल्पास सर्वोत्परी मानून माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी मतदारसंघांतील अल्पसंख्यांक समाज, आर्थिक दुर्बल घटक, महिला, गरीब सुविधा, नियमित पाणीपुरवठा या सर्व प्रश्न सुटून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळत आहे. असे प्रतिपादन यावेळी मा. भास्कर दानवे पाटील यांनी केळकर, लहू राठोड, विलास कापसे, मुरली सहारे, तुकाराम खरात, शिरसाट गंगाधरे, विठ्ठल इंदरकर, संभाजी वाघ, शरदराव खरात, गणेश तिडके,



कल्याण, युवा व कामगार यांचे सशक्तिकरण, समृद्धी, समान अधिकार, सुविधा, स्वास्थ सेवा या माध्यमातून जनसामान्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी नेहमीच कार्य केले आहे. दादांच्या नेतृत्वात जालना जिल्ह्याला विकासाला नवसंजीवनी लाभली आहे. त्यांच्या माध्यमातून रेल्वे, रस्ते, शिक्षण, रोजगार, पायाभूत यावेळी केले.

याप्रसंगी तालुका अध्यक्ष वसंतराव शिंदे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, कपिल दाहेकर, सुधाकर खरात, कैलास उबाळे, कृष्ण खिल्लारे, बद्री वाघ, मुकेश चव्हाण, गोपाळ चौधरी, रामजी शेजूळ, श्रीराम वाघ, करण निकाळजे, बालाजी आगाव, नागेश अंभोरे, निवृत्ती लंके,सतीश अमोल खांडेभराड, संजय खरात, शिवाजी खरात , राम केळकर, कांताराव जाधव, राधेशाम खरात, जगदीश खरात, जगदीश शेवाळे, संजय खरात, कैलास खरात, विश्वनाथ खलसे, बापूराव केळकर यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकारी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानासाठी विद्यार्थ्यांनी पेटून उठलं पाहिजे - उद्योगपती रायठ्ठा

## आदर्श शिक्षक शेख जमीर सर यांच्या सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** गुरु शिष्य परंपरा संस्थेमार्फत टेंभुर्णी येथील आदर्श शिक्षक, नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. यांच्या या सेवानिवृत्तीबद्दल आणि सेवापूर्ती कार्याबद्दल त्यांचा या संस्थेमार्फत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रसिद्ध उद्योगपती सुनील रायठ्ठा हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावरून बोलताना आजच्या शिक्षण संस्थेची व्यथा ते मांडत असताना सांगितले की शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासाठी पेटून उठायला सांगा,

आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये काही बदल करायला सांगितले, ज्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थी हा वावरताना दिसतोय त्याच्यात बदल घडायला हवा. ज्ञान कौशल्य यासारख्या गोष्टीकडे त्याचे मन वळवा. ज्ञानार्जनासाठी त्याला पेटून उठायला शिकवा. आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असतांना शिक्षकांच्या भूमिकेकडे लक्ष वेधले असतांना त्यांनी शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये रमून जात शिकवायला पाहिजे. शेख यांच्याबद्दल त्यांनी आदर्श शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या संपूर्ण कार्यकाळामध्ये सेवावृत्ती भाव ठेवल्या त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतांना असाच सेवाभावी वृत्ती सर्व शिक्षकांनी जागृती करायला हवी असेही मत त्यांनी मांडले. सेवानिवृत्त शिक्षक आदर्श शिक्षक श्री जोशी यांनीही शिक्षणाबद्दल आपली मत व्यक्त केली.



शिक्षणाची शिक्षण कार्यशाळा भरली पाहिजे, ज्यांनी शिक्षणात योगदान दिले जे शिक्षणात योगदान देऊ शकतात अशांची आज शिक्षण क्षेत्रामध्ये गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. या सत्काराला उत्तर देताना शेख सर यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की की शिक्षणामध्ये मी सेवाभावी वृत्ती लक्षात घेऊनच पूर्ण संपूर्ण कार्य केले आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू म्हणूनच मी कार्य केले आहे. या गुरु शिष्य परंपरेच्या निमित्ताने भरलेल्या या कार्यक्रमांमधून शिक्षणाबद्दलची अनास्थांमध्ये बदलायला हवी हासूर प्रत्येक वक्त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास उपस्थित त्यामध्ये किशोर खंडाळे, सुनील रायठा, सेवानिवृत्त शिक्षक जोशी सर, जगत घुगे, किशोर आगळे, डावरगाव चे आदर्श शिक्षक गोविंद जाधव, आदींची आवर्जून उपस्थिती होती. क्रमाचे सूत्रसंचालन मोरे सर यांनी केले. प्रास्ताविक ढाकरके सर यांनी केले.

# लाच लुचपत विभागांमधील कायद्यात मधील दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे. - डॉ. ॲड. दिपक कोल्हे



**जालना । प्रतिनिधी -** अतिरिक्त सरकारी अभियोक्ता डॉ. ॲड. दिपक कोल्हे यांचा अँटी करप्शन लॉ मध्ये विद्यावाचस्पती तथा पी.एच.डी. प्राप्त केल्या बद्दल एस.एन.कुळकर्णी यांचे अध्यक्षतेखाली सामाजिक कार्यकर्ते रमेश देहेडकर यांचे निवासस्थानी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना दिपक कोल्हे यांनी अँटी करप्शन लॉ मध्ये बदल होणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.

पुढे बोलताना त्यांनी अँटी करप्शन लॉ मध्ये ज्याने रु.१००.०० ची लाच स्वीकारली तर त्याला ज्या शिक्षेची तरतूद आहे तीच तरतूद करोडो रुपयांची लाच स्विकरणाऱ्याला आहे, या लाचेच्या प्रकरणात जेवढ्या काही केसेस होतात त्यात एक टक्काही केसेस यशस्वी होत नाही हे खरे दुर्दैव आहे. त्यांनी या विषयी जो प्रबंध सादर केला त्याची विस्तृत माहिती दिली. लाच लुचपत विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.तसेच ड. दिपक कोल्हे हे महाराष्ट्रातील एकमेव वकील ज्यांनी याविषयात डॉक्टरेट मिळवली.

या प्रसंगी माजी नगरसेवक रमेशराव देहडकर ,जेष्ठ समाजसेविका सौ.रसनाताई देहडकर, अध्यक्ष एस.एन. कुळकर्णी, कल्याणराव देशपांडे, डॉ.सुभाष भाले, श्रीकांत शेलगावकर, रवींद्र देशपांडे, डॉ.संजय रुईखेडकर, कैलाश भाले, डॉ.मनीष पाटील, सुनील लोणकर, शेख नईम, शेख फपू, मुकुंद कुळकर्णी, भगवान पुराणिक, विनायक गरदास, कृष्णा भालेराव, बरसाले, माऊली कोल्हे, सौ.छाया भाले, सौ.मंगल शेलगावकर, श्रीमती प्रभा हंडे आदी उपस्थित होते.

### आळंदी देवाची येथे ‘वारकरी संमेलन!’

# वारकरी आणि हिंदु धर्म यांच्या विरोधात चालू असलेले षड्यंत्र हाणून पाडण्याचा हजारो वारकरी आणि कीर्तनकारांचा निर्धार!

**आळंदी | प्रतिनिधी -** आळंदी देवाची येथे पार पडलेल्या ‘वारकरी संमेलना’त वारकरी आणि हिंदु धर्म व देवीदेवता यांच्या विरोधात चालू असलेले षड्यंत्र हाणून पाडण्याचा हजारो वारकरी आणि कीर्तनकारांचा निर्धार केला, तसेच प्रत्येक वारकर्यांनी ‘लव्ह जिहाद’चे षड्यंत्र संपवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. आळंदी देवाची येथे प्रदक्षिणा मार्गावरील फ्रुटवाले धर्मशाळा येथे हे संमेलन पार पडले. या संमेलनाचे आयोजन ‘वारकरी संप्रदाय’ आणि ‘हिंदु जनजागृती समिती’ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या वेळी वारकरी शिक्षण संस्थांना ग्रंथ आणि पुस्तक यांचे वाटप करण्यात आले. निवृत्त पोलीस उपअधीक्षक श्री. प्रकाश लोंढे यांनी हिंदु जनजागृती समितीच्या कार्याचा उद्देश सांगितला, तसेच त्यांच्या पुढाकाराने वारकरी संमेलन यशस्वी झाले.

या संमेलनाला ह.भ.प. संग्राम बापू भंडारे महाराज, गुरुवर्य ह.भ.प. ज्ञानेश्वर शिंदे महाराज, गुरुवर्य ह.भ.प. ज्ञानेश्वर कदम महाराज (छोटे माऊली), ह.भ.प. दत्तात्रय चोरघे म हाराज, ह.भ.प. दिगंबर महाराज नरावडे, ह.भ.प. नवल महाराज, ह.भ.प. नाम देव महाराज वाळके, ह.भ.प. संजय महाराज उंदरे, ह.भ.प. बाजीराव महाराज बांगर, ह.भ.प. संतोष आनंद म हाराज, ह.भ.प. महेंद्र महाराज मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती, तर ह.भ.प. कीर्तनकार-प्रवचनकार महाराज, वारकरी शिक्षण संस्थेतील गुरुवर्य आणि ज्येष्ठ साधक विद्यार्थी, हिंदुप्रेमी आणि राष्ट्रप्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.



ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून हिंदुत्व आणि हिंदु तत्त्वज्ञान यांकडे दुर्लक्ष करून केवळ सत्ता, संपत्ती आणि कीर्ती मिळवण्यासाठी अनेक ‘मंडळीं’नी स्वतःचे आयुष्य खर्ची घातले; मात्र हिंदु जनजागृती समिती याला अपवाद आहे. देशात पोलीस आाणि सरहद्दीवर सैनिक देशाचे संरक्षण करत आहेत, तर दुसरीकडे देशात हिंदु जनजागृती समिती निष्काम पणे हिंदु धर्माचा प्रसार करून हिंदु धर्मावरील आघात हाणून पाडण्याचे कार्य करत आहे. कुठेही विविध आघाडीवर हिंदु धर्मावर आघात होत असेल, तर लगेच तिकडे धावून जाऊन शीत युद्धाच्या विरोधात हिंदु जनजागृती समितीने लढा देत आहे. हिंदु धर्माचे रक्षण करणे हेच हिंदूंचे कर्तव्य आहे. माहेरचे संस्कार जपून सासरी रहाणार्या सुनेला ‘आदर्श सून’ असे म्हणतात. त्याप्रमाणे हिंदूंनी हिंदु धर्माचे कार्य कृतीतून करून दाखवले पाहिजे.

या वेळी ह.भ.प. संग्राम बापू भंडारे महाराज म्हणाले की, आळंदी येथे घेतलल्या वारकरी संमेलनाला वारकर्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे आता प्रत्येक ३ महिन्यांनी असे संमेलन आळंदी येथे झाले पाहिजे. परकीय आक्रमणे, जिहाद, धर्मांतर मोठ्या प्रमाणात होत असतांनाही वारकरी संप्रदायांनी आपली संस्कृती टिकवून ठेवली. यापुढे आपणाला मोठ्या प्रमाणात काम करावे लागणार आहे, तेव्हाच पुढील काळात धर्म टिकणार आहे. मुसलमान आपल्या वारीत जरी आले, तरी ते त्यांचा पंथ घेऊन येतात. ते त्यांच्या धर्माच्या प्रचारासाठी आपल्यात येतात. आपले हिंदु आपली संस्कृती सोडून गोल टोप्या घालून बसतात. हिंदु स्वतःचा धर्म सोडतात आणि मुसलमान स्वतः धर्म सोडत नाहीत. अन्य धर्मियांच्या षड्यंत्रापासून हिंदूंनी सावध झाले पाहिजे.

हिंदु संघटक आणि प्रसिद्ध लेखक श्री. समीर दरेकर म्हणाले की, हिंदूंनी इस्लाम आणि त्यांचा धर्मग्रंथ समजून घेणे आवश्यक आहे. ते समजून घेतल्यानंतर त्यांच्या लक्षात येईल की मुसलमान सर्वधर्मसमभाव का मानत नाहीत ? ख्रिश्चन लोक आता येशूचे अंभग काढत आहेत. येशूची प्रतिमा ठेवून श्रीसत्यनारायणाची पूजा केली जात

**पान २ वर**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.